PUBLICATION – SAKAL
DATE – AUGUST 25, 2011
PAGE NO - 1 (PUNE TODAY)

# आयटी कंपन्यांतून लोणचं अन् पापड्याही

## महिला बचत गटांनी तयार केलेली भीमथडी ब्रॅण्डची नऊ उत्पादने उपलब्ध

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २४ : महिला बचत गटांनी केलेल्या कुरडया, पापड्या, लोणची आता पुण्यातील आयटी कंपन्यांमधूनही मिळणार आहेत. भीमथडी ब्रॅण्डची नऊ उत्पादने या कंपन्यांत उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती बारामतीच्या ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या विश्वस्त सुनंदा पवार, सॉफ्टवेअर एक्स्पोर्ट असोसिएशन ऑफ पुणेचे अध्यक्ष गौरव मेहता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

क्यूलॉजिक इंडिया कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पराग मेहता, पर्सिस्टंट कंपनीचे नंदू देशपांडे, इटेलिमेन्टचे प्रशांत पानसरे या वेळी उपस्थित होते.

पवार म्हणाल्या, "ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टतर्फे दर वर्षी पुण्यात भीमथडी जत्रेचे आयोजन करून बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून दिली जाते. पण, वर्षातून केवळ एकदाच ही जत्रा भरत असल्याने नागरिकांना एकदाच उत्पादने मिळत होती. आता आयटी कंपन्यांमध्ये ही उत्पादने ठेवून, मागणीनुसार पुरवठा करता येईल. सध्या कांदा लसूण मसाला, मिरची पावडर, गरम मसाला, छोले मसाला, पुलाव मसाला, पापड, आंब्याचे लोणचे, आवळा कँडी, कुरडया ही नऊ उत्पादने कंपन्यांमध्ये देण्यात येतील. त्यासाठी बचत गटांना गुणवत्ता, पॅकिंगचे प्रशिक्षण दिले आहे."

या पदार्थांच्या निर्मितीचे काम सध्या चार बचत गट करतील, असे सई पवार यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, "मागणी वाढत जाईल, त्या प्रमाणात बचत गटांचा समावेश वाढेल. गुणवत्ता असलेले पदार्थ देण्यावर आमचा भर राहील. पुढच्या टप्प्यात ऑनलाइन मागणीही नोंदवता येईल; तसेच गोधडी, घोंगडी आदी वस्तूही विक्रीस ठेवण्याचा विचार आहे."

मेहता म्हणाले, "आमच्या संघटनेत सुमारे १०० कंपन्या आहेत. सुरवातीच्या टप्प्यात त्यातील सहा ठिकाणी ही उत्पादने ठेवली जातील. आयटी क्षेत्रातील लोकांना पारंपरिक व चांगल्या गुणवत्तेचे पदार्थ खाण्यास उपलब्ध होऊ शकतील."



**क्यूलॉजिक कंपनी : भीमथडी ब्रॅण्डअंतर्गत बचत गटातील महिलांनी निर्माण केलेली उत्पादने आयटी कंपन्यांमध्ये बुधवारपासून उपलब्ध करून देण्यात आली. या वेळी सुनंदा पवार, नंदू देशपांडे, गौरव मेहता, पराग मेहता, प्रशांत पानसरे.**